पोउपा/वाहतुक/प्रशा-१/अधिसुचना/ ४५ /२०१६
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग यांचे कार्यालय,
ठाणे शहर. दि. १२ /०८/२०१६

**ठाणे शहर**

संदर्भ :- वाहतुक नियंत्रण अधिसुचना क्र.पोउपा/वाहतुक/प्रशा-१/अधिसुचना/४३/२०१६ दि.१३-०७-२०१६

## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

ज्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये २४ तास सर्व प्रकारच्या वाहनांचे अवागमन होत असल्याने शहरातील वाहतुक व्यवस्थेवर त्यामुळे मोठा ताण निर्माण होउन शहरात सर्वत्र सर्वकाळ वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे ;

ज्याअर्थी, सदर कोंडीमुळे शाळेत जाणारी लहान मुले, नोकरीच्या ठिकाणी जाणारी चाकरमान मंडळी, रुग्णवाहिका व जीवनावश्यक सोईसुविधा पुरविणारी छोटी वाहने यांचे सुकर मार्गक्रमणास नित्याची बाधा निर्माण होत आहे ;

आणि, ज्याअर्थी, सर्व प्रकारच्या वाहनांना ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व महामार्ग व रस्त्यांवरुन सर्ववेळी वाहतुक करु दिल्यास वरील समस्येचे निराकरण करणे शक्य नाही अशी माझी खात्री झाल्याने वरिलप्रमाणे वाहतुक अधिसुचना निर्गमित करण्यात आली होती व त्याबद्दल सर्वसंबंधितांचे अभिप्राय मागविण्यात आले होते ;

त्याअर्थी, मी, संदीप भानुदासराव पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७-०९-१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्याअनुषंगिक कर्तव्यार्थ संदर्भिय अधिसुचनेस अनुसरुन प्राप्त सर्व अभिप्राय व सुचनांचा साकल्याने विचार करुन खालील प्रमाणे चार भागात अधिसुचना निर्गमित करित आहे :-

**भाग - १ :-** ठाणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमधुन खालील राष्ट्रीय महामार्गावरुन दररोज सकाळी ०८.०० ते दुपारी ११.०० वाजेदरम्यान व दुपारी ०५.०० ते रात्री १०.०० वाजेदरम्यान सर्व प्रकारच्या मल्टी एक्सल (सहापेक्षा जास्त चाके असणा-या ) वाहनांना वाहतुक करण्यास मनाई करण्यात येत आहे. संबंधित वाहने दुपारी ११.०० ते ०५.०० वा.दरम्यान व रात्री १०.०० ते सकाळी ०८.०० वा.दरम्यान सदरील मार्गावरुन वाहतुक करु शकतील :-

१) राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील वडपे - राजनोली - मानकोली - खारेगांव टोलनाका ते आनंदनगर दरम्यान
२) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील दहीसर मोरी - कल्याण फाटा ते मुंब्रा बायपास मार्गे खारेगांव टोलनाका दरम्यान
३) राज्य महामार्ग क्र.४२ (घोडबंदर रोड)
४) बदलापुर - अंबरनाथ - काटई फाटा

५) म्हापे ते शिळ फाटा

**<u>भाग - २</u> :-** ठाणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमधील वरील राष्ट्रीय व राज्य महामार्ग वगळुन खालील मार्गावरुन मल्टी एक्सल (सहापेक्षा जास्त चाके असणा-या) वाहनांना दररोज सकाळी ०८.०० ते रात्रौ १०.०० वा.दरम्यान वाहतुक करण्यास मनाई करण्यात येत आहे. सदरील वाहने नमुद रस्त्यांवर रात्री १०.०० ते सकाळी ०८.०० वा.दरम्यान वाहतुक करु शकतील.

१) भिवंडी - राजनोली नाका - दुर्गाडी - खडकपाडा (भिवंडी - मुरबाड रोड)
२) राज्य महामार्ग क्र.४०: दुर्गाडी ते कल्याण फाटा (कल्याण - शिळ फाटा रोड)
३) कापुरबावडी सर्कल - बाळकुम - कशेळी टोलनाका -अंजुरफाटा - वंजारपटटी (भिवंडी - वाडा रोड)
४) मानकोली - अंजुरफाटा - कारीवली - खारबांव - वसई रोड कडे जाणारा रस्ता (चिंचोटी - अंजुरफाटा रोड)

**<u>भाग - ३</u> :-** ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व शहरांच्या अंतर्गत मार्गावरुन सर्व प्रकारच्या मल्टीएक्सल (सहापेक्षा जास्त चाके असणा-या) वाहनांना सर्वकाळासाठी (चोविस तास) वाहतुक करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**<u>भाग - ४</u> :-** मोटार परिवहन कायद्याचे कलम २(१६) अन्वये परिभाषित सर्व प्रकारच्या अवजड माल वाहतुक (Heavy Goods Vehicles) करणा-या वाहनांना ठाणे पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे अंतर्गत मार्गावरुन दररोज सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वा.दरम्यान व दुपारी ०४.०० ते रात्री १०.०० वा.दरम्यान वाहतुक करण्यास मनाई करण्यात येत आहे. सदरील वाहने रात्री १०.०० ते सकाळी ०८.०० वा.दरम्यान ठाणे पोलीस आयुक्तालयातील शहरांचे अंतर्गत रस्त्यांवरुन वाहतुक करु शकतील.

सर्व संबंधित वाहनचालकांनी वरील निर्बंध केलेल्या वेळांचे ध्यान ठेवुन अर्निबंधवेळी सदर परिसरातुन वाहतुक करावी व अन्यवेळी सोईनुसार, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील रस्ते वगळुन अन्य पर्यायी मार्गाचा वापर करावा.

सदरची अधिसुचना दि.१५-०८-२०१६ पासुन पुढील तीन महिन्यांकरिता लागु राहील. सदर मार्गांबाबत यापुर्वी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व अधिसुचना याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत. या कालावधित काही सुचना / आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात पोलीस उपायुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाहा, एल.बी.एस.रोड, ठाणे (पश्चिम) येथे कळवावेत. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन तिमाहित काही सुचना वा आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढे सदरची अधिसुचना कायमस्वरुपी अंमलात राहील.

(संदीप भा.पालवे)
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दि अधिकारी, ठाणे

२/- या अधिसुचनेची प्रसिध्दि करणेस आपणास विनंती करणेत येत आहे.

<u>प्रत मा.सविनय सादर</u> :-

१.मा.पोलीस आयुक्त सा़ो, ठाणे शहर
२.मा.पोलीस सह आयुक्त सा़ो, ठाणे शहर.

३.मा.पोलीस सह आयुक्त सो, वाहतुक, बृहन्मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर
मा.आयुक्त, ठाणे, भिवंडी-निजामपुरा, कल्याण-डोंबीवली, उल्हासनगर महानगरपालिका.
मा.मुख्याधिकारी, अंबरनाथ, कुळगांव - बदलापुर नगरपरिषद.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी सुयोग्य दिशादर्शक फलक लावणेबाबत अधिनस्थ अधिका-यांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत माहितीस्तव
मा.जिल्हाधिकारी, ठाणे / मा.पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण / मा.पो.अधिक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, ठाणे
पोलीस उपायुक्त, वाहतुक, नवी मुंबई / मुख्य व्यवस्थापक (वाहतुक), जे.एन.पी.टी., न्हावाशेवा, नवी मुंबई.

प्रत कार्यवाहीस्तव
सर्व वाहतुक सपोआ. ठाणे / भिवंडी / कल्याण / उल्हासनगर
सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, ट्रॅफिक युनिट, ठाणे शहर.

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, ठाणे.
२/- कृपया त्यांनी सदरची अधिसुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर.
२/- त्यांनी याबाबतची प्रसिध्दि ई पोलीस पत्रकात द्यावी.